महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/न.क्र.९/COVID-१९-९/९९६९
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : ३१.०५.२०२०

# परिपत्रक

**विषय : कोवीड-१९ च्या व्यवस्थापनाबाबत राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचना.**

**संदर्भ :** १) शासन परिपत्रक क्र कोरोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि.२५.०४.२०२०
२) मासं/रवका/न.क्र.९/COVID-१९-६/९३०४ दि.०३.०५.२०२०
३) मासं/रवका/न.क्र.९/COVID-१९-६/९४२७ दि.०३.०५.२०२०
४) मासं/रवका/न.क्र.९/COVID-१९-७/९६०८ दि.१७.०५.२०२०
५) मासं/रवका/न.क्र.९/COVID-१९-८/९७०३ दि.२१.०५.२०२०
६) शासन निर्णय क्र कोरोना-२०२०/प्र.क्र.११०/आरोग्य-५ दि.२९.०५.२०२०
७) शासन पत्र क्र न्यायीक-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि.३०.०५.२०२०
८) महाराष्ट्र शासन आदेश क्र. डीएमयु/२०२०/सीआर ९२/डीसएम-१ दि. ३१.०५.२०२०.

महाराष्ट्र शासनाने संदर्भीत आदेश क्र ८ अन्वये दि.३०.०६.२०२० पर्यंत Lockdown ची मुदत वाढवलेली आहे. याच धर्तीवर, महावितरण कंपनीमध्ये Lockdown ची मुदत ही **दि.३०.०६.२०२०** पर्यंत वाढविण्यात येत आहे; तसेच, महाराष्ट्र शासनाच्या संदर्भीत आदेशामधील सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

२. शासन / महानगर पालीका आयुक्त / जिल्हा दंडाधिकारी यांनी संदर्भीत आदेश क्र ८ मधील कलम ५ नुसार नियंत्रीत/प्रतिबंधीत (Containment Zone) केलेली क्षेत्रामधील कंपनीची कार्यालये वगळता कलम ६ नुसार मुंबई महानगर क्षेत्रातील सर्व महानगरपालीका व MCGM, तसेच पुणे, सोलापूर, औरंगाबाद, मालेगाव, नाशिक, धुळे, जळगाव, अकोला, अमरावती आणि नागपूर या महानगरपालीका क्षेत्रामधील कंपनीच्या प्रशासकीय कार्यालयामध्ये एकूण कर्मचारी संख्येच्या १५% किंवा १५ कर्मचारी या पैकी जी कोणती संख्या जास्त असेल तेवढया कर्मचाऱ्यांची उपस्थिती आवश्यक आहे आणि या क्षेत्रांव्यतीरीक्त इतर क्षेत्रांमधे कंपनीच्या सर्व कार्यालयामध्ये १००% कर्मचाऱ्याची उपस्थिती आवश्यक आहे. सदरची सुचना दि.०३.०६.२०२० पासून आमलात येईल.

३. राज्यामध्ये बंद (Lockdown) शिथील करण्यात आल्याने संदर्भीत परिपत्रक क्र ३ मधील क्र ५ (i), (ii), (iii), (iv) व (v) या सुचना दि.०३.०६.२०२० पासून रद्द करण्यात येत आहे.

४. महावितरण कंपनी मधील कार्यालयांमध्ये कोरोना (COVID-१९) या विषाणू रोगाचा संसर्ग/प्रादुर्भाव रोखण्यासाठी घ्यावयाच्या दक्षतेबाबतच्या मार्गदर्शक सुचना वेळोवेळी निर्गमीत करण्यात आल्या आहेत. आता, महाराष्ट्र शासन, सार्वजनीक आरोग्य विभाग यांचा शासन परिपत्रक क्र कोरोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि.२५.०४.२०२०, शासन निर्णय क्र कोरोना-२०२०/प्र.क्र.११०/आरोग्य-५ दि.२९.०५.२०२० व शासन पत्र क्र न्यायीक-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि.३०.०५.२०२० अन्वये कोरोना विषाणू रोगाचा संसर्ग/प्रादुर्भाव रोखण्यासाठी घ्यावयाच्या दक्षतेबाबत मार्गदर्शक अतिरिक्त सुचना निर्गमीत करण्यात आल्या आहेत त्या सुचनांचे देखील काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

५. सबब, सर्व सक्षम अधिकारी / नियंत्रण अधिकारी यांनी वेळोवेळी निर्गमीत केलेल्या सुचनेनुसार त्यांच्यास्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

६. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

सोबत : १)शासन परिपत्रक दि.२५.०४.२०२०
२)शासन निर्णय दि.२९.०५.२०२०
३)शासन पत्र दि.३०.०५.२०२०
४)दि. ३१.०५.२०२० रोजीचा शासन आदेश.

(कमांडर शिवाजी इंदलकर) (से.नि.)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

Scanned with CamScanner

**कोविड-१९ विषाणूचा संसर्ग / प्रादुर्भाव रोखण्यासाठी कार्यरत असलेल्या विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी घ्यावयाच्या दक्षतेबाबतच्य मार्गदर्शक सूचना**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
गोकुळदास तेजपाल रुग्णालय कंपाऊंड, कॉम्प्लेक्स बिल्डिंग, १० वा मजला,
नवीन मंत्रालय,मुंबई ० ४०० -०१
**शासन परिपत्रक क्र. करोना-२०२०/प्र क्र ५८/ आरोग्य ५**
**दिनांक २५ एप्रिल, २०२०.**

**प्रस्तावना :**

राज्यात कोवीड १९या विषाणुच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे संसर्गांचे प्रमाण वाढत असल्याचे आढळून येत आहे. यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून राज्यात लॉकडाऊन केले असले तरी आपत्कालीन सेवेअंतर्गत आरोग्य / पोलीस / स्वच्छता / विद्युत/ महसुल /ग्राम विकास / शिधावाटप इत्यादी विभागातील अधिकारी / कर्मचारी कार्यरत आहेत. तसेच विभाग व क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयीन आस्थापना मर्यादीत स्वरुपात सुरु आहेत.

आपत्कालीन परिस्थितीत कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी आपले कर्तव्य पार पाडत असतांना काही अधिकारी / कर्मचारी कोवीड १९ने बाधित झाल्याचे निदर्शनास आले आहे.

केंद्र व राज्य शासनाकडून कोवीड १९ प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत सर्व माध्यमातून मोठया प्रमाणात जनजागृतीही करण्यात आलेली आहे. त्यानुसार भविष्यात या आजाराचा संसर्ग टाळण्यासाठी घ्यावयाच्या दक्षतेबाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

**परिपत्रक :**

- कर्तव्यावर जातांना नियमानुसार विहीत गणवेशाबरोबरच मास्क, हातमोजे व आवश्यकतेनुसार ॲप्रन परिधान करावा.
- कार्यालयात अथवा कामकाजाच्या ठिकाणी साबण, पाणी, व हॅन्ड सॅनिटायझर उपलब्ध असल्याचे खातरजमा करावी.
- आपल्या दैनंदिन कामकाजाला सुरुवात करण्यापुर्वी आपले हात साबण व पाण्याने किमान २० सेकंद स्वच्छ धुवावे. यानंतरच हातमोज्यांचा उपयोग करावा. हातमोजे घातल्यानंतर चेहरा, डोळे, नाक, तोंड यास स्पर्श करु नये. हातमोजे खिशात घालण्याचे टाळावे.
- जेथे सॅनिटायझर उपलब्ध असेल तेथे किमान ७ मिलीलिटर सॅनिटायझर हातावर घेऊन दोन्ही तळहातांना मागेपुढे लावावे. सॅनिटायझर किमान ६० टक्के अल्कोहोल असणारे असावे.
- आपण ज्या कार्यालयात अथवा कर्तव्याच्या ठिकाणी काम करत असू व ज्या वस्तुंना वारंवार हाताने स्पर्श होण्याचा संभव आहे अशा गोष्टींना (दरवाज्याचे हॅन्डल, पाण्याचे नळ इत्यादी) दोन

ते तीन तासाने एक टक्का प्रमाणात सोडीयम हायपोक्लोराईड असलेल्या निर्जतुकीकरण द्रावणाने स्वच्छ करावे.

- हाताने चेहरा, डोळे, नाक, तोंड यास स्पर्श करु नये.
- दैनंदिन काम करत असतांना दोन व्यक्तींमधील कमितकमी अंतर एक मिटर ठेवावे.
- एकत्रित जास्त संख्येने काम करण्याची वेळ आल्यास कामाच्या ठिकाणी छोटे छोट समुह करण्यात यावे जेणेकरुन अपघाताने कोवीड १९ चा जंतुसंसर्ग झाल्यास फक्त त्या समुहातील संपर्क व्यक्तींचे विलगीकरण करणे शक्य होईल व दैनंदिन कामकाजावर विपरित परिणाम टाळता येईल.
- भ्रमणध्वनीचा वापर करतांना शक्यतो स्पिकरफोनचा वापर करावा. भ्रमणध्वनीचा स्पर्श शक्यतो चेहऱ्याला टाळावा.
- कार्यालयातून / कर्तव्याच्या ठिकाणावर आंघोळ करण्याची सुविधा उपलब्ध नसल्यास कर्तव्यावरुन घरी परत गेल्यावर लगेच साबण व स्वच्छ पाण्याने आंघोळ करावी.

**वैय्यक्तिक संरक्षक साधनांचा वापर :**

- स्वच्छता विभाग / आरोग्य विभाग / पोलीस दलात कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या वैय्यक्तिक संरक्षक साधनांचा योग्यपणे व नियमित वापर करावा.
- मास्क वापरतांना सदर मास्क तोंड व हनुवटी झाकून जाईल अशा पध्दतीने लावावा. नाकावर ठेवण्यायोग्य भाग नाकाच्या हाडावर बसवावा. मास्कची लेस कानावरुन व मानेच्या मागील बाजूस बांधावी जेणेकरुन आपला चेहरा व मास्क यामध्ये अंतर राहणार नाही याची खात्री करावी. मास्क मानेला लटकवू नये, चेहऱ्यावरील मास्कला स्पर्श करणे टाळावे. मास्क ओलसर झाल्यास तो त्वरीत बंद कचरापेटीत शक्यतो कागदात लपेटून फेकावा व नविन मास्क घालावा. मास्क काढतांना प्रथमत: खालील बाजूने काढावा नंतर लेसचा वापर करुन मास्क हाताळावा. मास्क काढतांना मास्कचा शरीराच्या इतर कोणत्याही भागास स्पर्श होणार नाही याची काळजी घ्यावी. त्याचप्रमाणे वापरलेले मास्क, रबरी हातमोजे इत्यादीची विल्हेवाट बंद कचरापेटीत करावी.
- सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी एकमेकांचे मोबाईल फोन, रुमाल, पाणी बॉटल, ग्लास इत्यादी बाबी वापरु नयेत अथवा हाताळू नयेत.
- सर्व विभागप्रमुख कार्यालय प्रमुख यांना आपल्या अधिनस्थ अधिकारी व कर्मचारी यांना त्यांच्या कर्तव्याशी निगडीत तांत्रिक क्षमतेचे पर्सनल प्रोटेक्टीव्ह किट, हॅन्डग्लोव्हज, ॲप्रन, स्वच्छता कर्मचाऱ्यांना गमबूट, जॅकेट, रबरी हातमोजे, मास्क, साबण व सॅनिटायझरचा आवश्यकतेनुसार पुरवठा करावा.

सर्व कार्यालय प्रमुखांना उपरोक्त नुसार सूचना कर्तव्यावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी प्रसारित कराव्यात व या सूचनांची काटेकोर अंमलबजावणी होते किंवा नाही याची पडताळणी करण्यासाठी नोडल अधिकारी यांची नेमणूक करावी व आपले अधिनस्थ अधिकारी व कर्मचारी कोवीड १९ पासून बाधित होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(डॉ. प्रदीप व्यास)
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४) मा. मंत्री (आरोग्य), मंत्रालय, मुंबई
५) मा. राज्यमंत्री (आरोग्य) मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
७) सचिव, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
८) आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुबई
९) सर्व विभागीय आयुक्त
१०) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
११) जिल्हाधिकारी (सर्व)
१२) मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव
१३) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई / पुणे
१४) प्रत उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळ (सर्व)
१५) प्रत जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)
१६) प्रत जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)
१७) निवड नस्ती-आरोग्य ५

२०२००५२९१७११०७०८१७

**महाराष्ट्र राज्यात तंबाखू, सुपारी, पान, पानमसाला, गुटखा तसेच इतर तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवानास/ थुंकण्यास व धुम्रपानास (ई-सिगारेटसह) प्रतिबंध करण्याबाबत....**

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्र. कोरोना-२०२०/प्र.क्र.११०/आरोग्य-५,
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,
संकुल इमारत, नविन मंत्रालय, मुंबई
दिनांक : २९ मे, २०२०

<u>संदर्भ</u> :-

१) साथरोग अधिनियम, १८९७.
२) राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५.
३) मुंबई पोलिस अधिनियम, १९५१ व फौजदारी दंड प्रक्रिया संहिता, १९७३.
४) केंद्र शासनाचा सिगारेट आणि अन्य तंबाखूजन्य उत्पादने (जाहिरात प्रतिबंध, व्यापार विनियमन आणि वाणिज्य उत्पादन पुरवठा आणि वितरण) कायदा, २००३.
५) शासन निर्णय क्र. तंबाखू-२००३/प्र.क्र.२५३/आरोग्य-५, दिनांक ०२.०४.२०१६.
६) केंद्र शासन पत्र क्र. File No.Z.२१०२०/१९/२०२०-TC, दिनांक १०/४/२०२०.
७) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग परिपत्रक क्र. तंबाखू-२०१४/प्र.क्र.१५९/ आरोग्य-५, दि.१६/७/२०१४.

<u>प्रस्तावना</u> :-

मुंबई पोलिस अधिनियम, १९५१ च्या कलम ११६ मधील तरतुदीनुसार सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यावर आणि धुम्रपानावर प्रतिबंध आहे. केंद्र शसनाच्या, सिगारेट आणि अन्य तंबाखूजन्य उत्पादने (जाहिरात प्रतिबंध, व्यापार विनियमन आणि वाणिज्य उत्पादन, पुरवठा आणि वितरण) कायदा, २००३च्या कलम ४ मधील तरतुदीनुसार सार्वजनिक ठिकाणी धुम्रपानावर प्रतिबंध करण्यात आला आहे. अन्न सुरक्षा आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांची अधिसूचना, अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६, क्र. एमएसएसए/अधिसुचना/७७७-२०१३/७, दिनांक १८ जुलै, २०१३ अनुसार लोकांच्या आरोग्याच्या हितासाठी स्वादिष्ट/सुगंधित तंबाखू, स्वादिष्ट/सुगंधित सुपारी यांची निर्मिती, साठवण, वितरण किंवा विक्री करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

सार्वजनिक ठिकाणी धुम्रपानावर आणि थुंकण्यावर, वरील अधिनियमान्वये प्रतिबंध असला तरी, आणि त्या माध्यमातून दंडात्मक कार्यवाही होत असली तरी, सार्वजनिक ठिकाणी थुंकण्याचे आणि धुम्रपान करण्याचे प्रमाण कमी झाल्याचे दिसत नाही. थुंकण्यामुळे सार्वजनिक मालमत्ता विद्रुप होते व विद्रुप झालेल्या भिंती पुन्हा पुन्हा रंगविण्यासाठी जनतेने कर रुपाने दिलेला पैसा खर्च करणे प्रशासनास भाग पडते. याशिवाय महत्वाचे म्हणजे यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होतो व याचा दुष्परिणामामुळे कर्करोग, श्वसन आजार, पुनरुत्पादन संस्थेचे आजार, पचनसंस्थेचे आजार तसेच क्षयरोग, स्वाईन फ्ल्यु, न्युमोनिया यांसारख्या प्राणघातक आजारांचा फैलाव होतो. आता तर कोवीड सारख्या महामारीचा संसर्ग हा थुंकीच्या माध्यमातून होत असल्याचे निष्पन्न झाल्याने, याबाबत अतिदक्षता घेऊन सर्व जनतेच्या हितास्तव

प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्याने, याबाबत शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

१) साथरोग अधिनियम, १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ मधील तरतुदींच्या अधिन राहून, तसेच या शासन निर्णयाच्या संदर्भामध्ये नमूद केलेल्या विविध आदेशांच्या अधिन राहून, **राज्यात कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी तंबाखू, सुपारी, पान, पानमसाला, गुटखा तसेच इतर तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवानास/ थुंकण्यास व धुम्रपानास (ई-सिगारेटसह) प्रतिबंध करण्यात येत आहे.**

२) **साथरोग अधिनियम, १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ नुसार घोषित केलेले सक्षम प्राधिकारी त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रात या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यास तसेच या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी अधिकार प्रदान करण्यास सक्षम असतील.**

३) याचे उल्लंघन करणाऱ्यावर साथरोग अधिनियम, १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ तसेच भारतीय दंड संहितेमधील कलमातंर्गत कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

४) याशिवाय वर नमूद केलेल्या अधिनियम व नियम यांचे उल्लंघन केल्यास (परिशिष्ट-१) नुसार शिक्षा व दंड आकारण्यात यावा व दंडाची रक्कम यासाठी नमूद केलेल्या स्वतंत्र लेखाशिर्षामध्ये (परिशिष्ट-२ मध्ये नमूद) भरण्याची कार्यवाही करण्यात यावी.

५) या अनुषंगाने सर्व सक्षम प्राधिकाऱ्यांनी त्यांचे अधिपत्याखालील क्षेत्रात प्रतिबंधात्मक आदेश/दंड व दंडनीय कारवाई याबाबत व्यापक प्रसिध्दी द्यावी व कार्यालये तसेच सार्वजनिक ठिकाणी दर्शनी भागात जनजागृती करणारी फलके प्रसिध्द करावीत.

६) हे आदेश संपूर्ण राज्यातील शासकीय/निम शासकीय/खाजगी/विविध मंडळे/परिमंडळे/ महामंडळे/औद्योगिक/व्यावसायिक/वाणिज्य/शैक्षणिक/वैद्यकीय/रहिवासी क्षेत्र व संकुले/ रेल्वे स्थानके/बस स्थानके/जल वाहतुक स्थानके/बंदरे क्षेत्र/ न्यायालयीन संस्था/ देवस्थाने/बगीचे/पर्यटन स्थळे/शॉपिंग मॉल/तरण तलाव/सिनेमागृहे/व्यायाम शाळा/रस्ते/ बाजार पेठा/हॉटेल्स इ. संस्था व आस्थापना व सार्वजनिक क्षेत्रांच्या ठिकाणी/आवारातही लागू राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०२००५२९१७११०७०८१७असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(डॉ. प्रदीप व्यास)

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव.
२) मा. मुख्यमंत्री याचे खाजगी सचिव.
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४) मा. विधान परिषद अध्यक्ष यांचे खाजगी सचिव.
५) मा. विधान सभा अध्यक्ष यांचे खाजगी सचिव.
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
७) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग, मुंबई.

८) विभागीय आयुक्त (सर्व)
९) आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई.
१०) आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, वरळी, मुंबई.
११) आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई.
१२) धर्मादाय आयुक्त, धर्मादाय आयुक्त कार्यालय, वरळी, मुंबई.
१३) महानगरपालिका आयुक्त (सर्व)
१४) जिल्हाधिकारी (सर्व)
१५) मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी.
१६) संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई/पुणे.
१७) संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई.
१८) अधिष्ठाता, वैद्यकीय महाविद्यालय (सर्व).
१९) सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
२०) उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व).
२१) जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व).
२२) जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व).
२३) सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था.
२४) वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका (सर्व).
२५) धर्मादाय संस्था संचलित/खाजगी/रेड क्रॉस रक्तपेढया (सर्व).
२६) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व).
२७) जिल्हा हिवताप अधिकारी (सर्व)
२८) सर्व शासकीय/निम शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/शैक्षणिक संस्था (शासकीय/खाजगी)/विद्यापीठे/औद्योगिक मंडळे/वसाहती इ.
२९) मा. मंत्री / राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३०) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय यांचे स्वीय सहाय्यक.
३१) निवड नस्ती (आरोग्य-५).

शासन निर्णय क्र. कोरोना-२०२०/प्र.क्र.११०/आरोग्य-५,२८मे, २०२० सोबतचे परिशिष्ट

## परिशिष्ट - अ

विविध कायदा / अधिनियम / दंड संहितेचा भंग केल्यानंतर करावयाची कार्यवाही :-

| अ.क्र. | कायदा / अधिनियम / दंड संहिता | दंड |
|---|---|---|
| १. | मुंबई पोलिस अधिनियम,१९५१ कलम ११६ (बदल : २०१३, २०१५) | पहिला गुन्हा : रु. १०००/- दंड व १ दिवस सार्वजनिक सेवा<br>दुसरा गुन्हा : रु. ३०००/- दंड व ३ दिवस सार्वजनिक सेवा<br>तिसरा व त्यानंतर : रु. ५०००/- दंड व ५ दिवस सार्वजनिक सेवा |
| २. | अन्न व सुरक्षा विभागाची अधिसूचना, दि. १८ जुलै, २०१३ | |
| ३. | भारतीय दंड संहिता, १८६०, कलमे २६८, २७०, २७२ व २७८ | कलम २६८ : दंड<br>कलम २६९ : ६ महिने शिक्षा किंवा दंड किंवा दोन्ही<br>कलम २७० : २ वर्ष शिक्षा किंवा दंड किंवा दोन्ही<br>कलम २७२ : ६ महिने शिक्षा किंवा दंड किंवा दोन्ही<br>कलम २७८ : रु. ५०० पर्यंत दंड |
| ४. | सिगारेट आणि अन्य तंबाखूजन्य उत्पादने (जाहिरात प्रतिबंध, व्यापार विनियमन आणि वाणिज्य उत्पादन पुरवठा आणि वितरण) कायदा २००३ | कलम ४ : रु. २०० पर्यंत दंड<br>कलम ५ : पहिला गुन्हा : रु. १००० पर्यंत दंड किंवा २ वर्षे शिक्षा किंवा दोन्ही<br>दुसरा गुन्हा : रु. ५००० पर्यंत दंड किंवा ५ वर्षे शिक्षा किंवा दोन्ही<br>कलम ६ अ, ६ ब : रु. २०० पर्यंत दंड<br>कलम ७ : उत्पादकाचा पहिला गुन्हा : रु. ५००० पर्यंत दंड किंवा २ वर्षे शिक्षा किंवा दोन्ही, दुसरा गुन्हा : रु. १०,००० पर्यंत दंड किंवा ५ वर्षांची शिक्षा<br>विक्रेत्याचा पहिला गुन्हा : रु. १००० पर्यंत दंड किंवा १ वर्ष शिक्षा, दुसरा गुन्हा : रु. ३००० पर्यंत दंड किंवा २ वर्षे शिक्षा |

*******

शासन निर्णय क्र. कोरोना-२०२०/प्र.क्र.११०/आरोग्य-५२८मे, २०२० सोबतचे परिशिष्ट

परिशिष्ट - ब

| | |
|---|---|
| योजनेचे संक्षिप्त नाव : तंबाखु नियंत्रण कार्यक्रम | Scheme Short Tital : Prohibition of Smoking |
| विभाग : आर-सार्वजनिक आरोग्य विभाग | Department : R-Public Health Department |
| ०२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य | ०२१० Medical and Public Health |
| ०४ सार्वजनिक आरोग्य | ०४ - Public Health |
| (१०४) फी, दंड इत्यादी | (१०४) Fees and Fines etc |
| ०१ फी, दंड इत्यादी | ०१ Fees and Fines |
| (०१) (०४) तंबाखु नियंत्रण कार्यक्रमाखालील सार्वजनिक ठिकाणी धुम्रपानास प्रतिबंध, नियमानुसार दंड वसुली | (०१) (०४) Receipt under Prohibition of Smoking in Public Places Rules for Tobacco Control Activities. |
| संकेतांक : (०२१००६७२०१) | Scheme Code : (०२१००६७२०१) |

या शासन निर्णयातील तरतुदींचा भंग केल्यास, दंडनीय कारवाई म्हणून द्यावयाचा पावती व चलानचा नमुना शासन निर्णय क्र. तंबाखू-२०१३/प्र.क्र.२५३/आरोग्य-५, दिनांक ०२.०४.२०१६ समवेतच्या परिशिष्टानुसार असेल.

*******

महाराष्ट्र शासन

**क्र. न्यायीक२०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य ५**
सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार
कॉप्लेक्स बिल्डिंग, नविन मंत्रालय,
मुंबई-४०० ००१.
**दिनांक- ३० मे, २०२०**

प्रति,

| | |
|---|---|
| जिल्हाधिकारी ........................ ...................... | (सर्व) |
| महानगर पालिका आयुक्त ............ ..................... | (सर्व) |
| उप संचालक आरोग्य सेवा, प्रभारी मंडळ .............. | (सर्व) |
| जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद................ | (सर्व) |
| जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय.............. | (सर्व) |
| वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका......... | (सर्व) |
| कार्यकारी आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका | |

**विषय : कोव्हीड १९ साथ उद्रेक कालावधीमध्ये कार्यालयांबाबत मार्गदर्शक सूचना . . .**

संदर्भ : केंद्रशासना कडून प्राप्त झालेल्या मार्गदर्शक सूचना दिनांक १८.०५.२०२०

राज्यामध्ये राज्य / केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सार्वजनिक कार्यालये टप्प्या-टप्प्याने कार्यरत होत आहेत. नजीकच्या कालावधीमध्ये या कार्यालयांमधील कर्मचा-यांची आणि अभ्यागतांची संख्या वाढेल. कार्यालयामध्ये वर्दळ वाढल्यामुळे कोवीड-१९ चा प्रसार होऊ नये यासाठी खालील प्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

**सर्वसाधारण सूचना :-**

- कार्यालयात प्रवेश करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांचे व अभ्यागतांचे तापमान दररोज थर्मल स्कॅनर/इन्फ्रारेड थर्मामीटर ने तपासावे. सदरच्या थर्मल स्कॅनर / इन्फ्रारेड थर्मामीटर मध्ये योग्य तापमानाची नोंद होत आहे किंवा नाही, याची रोज खात्री करावी.
- हवा खेळती राहण्याकरिता कार्यालयातील सर्व खिडक्या उघड्या ठेवाव्यात.
- कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी किमान ३ पदरी कापडाचा मास्क (ट्रिपल लेयर मास्क / सर्जिकल मास्क) संपूर्ण कार्यालयीन वेळेमध्ये वापरावा.

- कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जंतुसंसर्ग टाळण्यासाठी आपल्या नाकाला, डोळ्यांना तसेच तोंडाला वारंवार हात लावणे टाळावे.
- जर खोकला / सर्दी असेल तर टिशू पेपरचा किंवा रुमालाचा वापर करावा. रुमाल स्वच्छ व धुतलेला असावा. रुमाल दररोज धुवून स्वच्छ करावा. शिंकतांना व खोकतांना रुमालाचा वापर अवश्य करावा. टिशू पेपरचा वापर झाल्यानंतर त्वरित बंद कचरा पेटीत टाकावा व हात स्वच्छ धुवून घ्यावेत.
- कार्यालयात दोन कर्मचाऱ्यांमध्ये अंतर किमान ३ फूट असावे. आवश्यक असल्यास बैठक व्यवस्थेची फेररचना करावी.
- कार्यालयात प्रवेश करणाऱ्या सर्व अभ्यागतांनी सदैव मास्क घालणे अनिवार्य आहे.
- कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळच सॅनिटायझरची तसेच प्रत्येक स्वच्छतागृहात साबण / हँडवॉशची व्यवस्था करावी.
- सर्वांनी आपले हात कमीतकमी २० सेकंदाकरिता साबणाने स्वच्छ धुवावेत. प्रत्येक दोन तासांनी तसेच स्वच्छतागृहाचा वापर केल्यानंतर साबणाने हात स्वच्छ धुवावे.
- वारंवार वापरण्यात येणाऱ्या वस्तू उदा. लिफ्ट मधील बटन, बेल, टेबल, खुर्च्या व इतर कार्यालयातील उपकरणे २% सोडियम हायपोक्लोराइट सोल्युशनने दिवसातून तीन वेळा स्वच्छ पुसून घ्यावी.
- कार्यालयातील सर्व कम्प्युटर, प्रिंटर, स्कॅनर इ. दिवसातून दोन वेळा स्वच्छ पुसून घ्यावेत. या वस्तुंचे निर्जंतुकीकरण ७०% अल्कोहोल असलेले सॅनिटायझरने करण्यात यावे.
- कार्यालय साबण व पाण्याने नियमितपणे धुवून घ्यावे. हे करताना सफाई कामगाराने Gloves, रबर बूट व ट्रिपल लेयर मास्क चा वापर करावा व काम झाल्यास त्वरित सर्व काढून त्वरित जैव वैद्यकीय कचरा (Bio-Medical Waste) च्या नियमानुसार विल्हेवाट लावावी व हात स्वच्छ धुवून घ्यावेत.
- कोव्हीड चा संसर्ग रोखण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना दर्शनीय स्थळांवर लावाव्या.

**कर्मचारी / अधिकारी यांच्याकरिता सर्वसाधारण सूचना:**

- एकाच वाहनामधून अनेक अधिकारी/ कर्मचारी यांनी प्रवास करु नये.
- e-office चा जास्तीत जास्त वापर करावा व फाईल्स ई-मेल द्वारे पाठवाव्या.
- कमीत कमी अभ्यागतांना कार्यालयात प्रवेश दयावा. कार्यालयात येणाऱ्या सर्व अभ्यागतांचे तापमान थर्मल स्कॅनर ने तपासण्याबाबत सूचना निर्गमित कराव्यात.

- सदर काळामध्ये कार्यालयीन बैठकांसाठी अधिकारी / कर्मचाऱ्याना प्रत्यक्ष बोलवू नये. त्याऐवजी व्हिडीओ कॉन्फरन्सचा वापर करावा. कार्यालयात अधिकारी/कर्मचारी यांनी एकत्र बसणे, डबा खाणे किंवा एका ठिकाणी जमा होणे टाळावे व त्याकरिता सदर पत्रानुसार त्वरीत आदेश निर्गमित करावेत.
- एकच काम अनेक व्यक्तींनी करणे आवश्यक असल्यास २-३ व्यक्तींचे लहान गट करावेत यामुळे कर्मचाऱ्यांस जंतुसंसर्ग झाला तरी फक्त त्यांच्या गटाचे अलगीकरण होईल.

**कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांना कोव्हीड संसर्ग झाल्यास :-**

- कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांस ताप १००.४ डिग्री फॅरेनहाईट पेक्षा जास्त ताप / खोकला / दम लागत असल्यास तात्काळ रुग्णालयात भरती करावे.
- कोव्हीड अहवाल पॉझिटिव्ह असल्यास संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना पुढील १४ दिवस कार्यालयात येऊ देऊ नये. अलगीकरणाबाबत आरोग्य विभागाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यवाही करावी.
- कर्मचाऱ्याचा अहवाल Positive आल्यास Contact tracing करुन High risk व Low risk contact ची यादी करावी.
- अहवाल Positive आलेल्या कर्मचाऱ्यांशी ३ फूटांपेक्षा कमी अंतर ठेऊन १५ मिनिटांपेक्षा जास्त संपर्क आलेल्या सर्व कर्मचारी / अधिकाऱ्यांचे हाय रिस्क असे वर्गीकरण करावे.
- कार्यालयाच्या हॉल / खोली मधील इतर व्यक्ती, कार्यालयीन कामासाठी ३ फूटांपेक्षा जास्त अंतरावरुन संपर्कात आलेल्या व्यक्तींचे लो रिस्क असे वर्गीकरण करावे.
- हाय रिस्क वर्गीकरण केलेल्या कर्मचाऱ्यांना Institutional Quarantine मध्ये दाखल करावे. याबाबत पुढील कार्यवाही आरोग्य विभागाव्दारे निर्गमित मार्गदर्शक सूचनांनुसार करावे.
- लो रिक्स वर्गीकरण केलेल्या कर्मचाऱ्यांनी, जर मास्कचा वापर केला असेल व अन्य मार्गदर्शक सूचनांचे पालन केले असेल तर त्यांनी नियमीतमणे कार्यालयीन कामकाज करावे व जर संबंधीतांनी मास्कचा वापर केलेला नसेल तर त्यांना पुढील १४ दिवस त्यांच्या घरी Quarantine करावे व त्यांना घरुन शासकीय कामकाज करण्याच्या सूचना दयाव्यात. अशा कर्मचाऱ्यांना ताप / खोकला / थकवा / धाप लागणे इ. लक्षणे आढळल्यास त्वरीत दवाखान्यातील अलगीकरण (Quarantine) कक्षात दाखल करण्यात यावे.
- जर कार्यालयात कोव्हीड पॉझिटिव्ह कर्मचारी / अधिकारी आढळले तर सदर व्यक्तीची दिनचर्या व काम करीत असलेले क्षेत्र पाहून, सदर इमारत किंवा त्या इमारतीचा ती विंग किंवा तो मजला, मार्गदर्शक सुचनांनुसार निर्जंतुक करावेत. निर्जंतुकीकरणानंतर कार्यालयाचे काम पुन: सुरु करावे.

- **सदर निर्जंतुकीकरण करताना खालील मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करावा.**

१. निर्जंतुकीकरण करण्यासाठी फरशी पुसताना तीन बादल्यांचा उपयोग करावा (three bucket system). एका बादलीमध्ये पाणी व डिटर्जन्ट, दुसऱ्यामध्ये स्वच्छ पाणी आणि तिसऱ्या बादलीमध्ये निर्जंतुकीकरण करण्याकरिता १% सोडीयम हायपोक्लोराईटचे द्रावण घ्यावे.

२. फरशी प्रथम डिटर्जंन्ट असलेल्या पाण्याने स्वच्छ करावी.

३. पुसलेले कापड दुसऱ्या बादलीमधील असलेल्या पाण्याने स्वच्छ करुन घ्यावे आणि ते कापड तिसऱ्या बादलीत असलेल्या १% हायपोक्लोराईटच्या द्रावणामध्ये बुडवून त्याने पुन्हा एकदा फरशी पुसून घ्यावी.

४. फरशी पुसताना एकाच दिशेने (Unidirectional Method) आतून बाहेरील बाजू पुसण्यात यावी.

५. दरवाजा, खिडक्या, लिफ्ट, इ. सोडीयम हायपोक्लोराईटचे १% ने पुसून घ्याव्यात.

६. कॉम्प्युटर, प्रिंटर, कि-बोर्ड, माऊस, स्कॅनर, इ. इलेक्ट्रानिक वस्तु ७०% अल्कोहोल असलेले सॅनिटायझरने पुसून घ्याव्यात.

७. कार्यालयीन शौचालये दिवसातून तीन वेळा सोडीयम हायपोक्लोराईट १% किंवा Detergent चा वापर करुन स्वच्छ ठेवावीत.

८. जर एकाच वेळी ५ किंवा त्यापेक्षा जास्त रुग्ण आढळून आले तर, हाड्रोजन पॅरॉक्साईड ($H_2O_2$) चा वापर करुन सदरचे भागात Fogging करुन, २४ तासानंतर इमारतीचा वापर सुरु करण्यात यावा.

सदर पत्रानुसार आपल्या स्तरावर त्वरीत कार्यवाही करण्यात यावी.

प्रदीप व्यास 30-5-2020

( **डॉ प्रदीप व्यास** )

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत**

आयुक्त तथा अभियान संचालक, रा.आ.अ., मुंबई -१

संचालक आरोग्य सेवा, मुंबई / पुणे.

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Department of Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation, Mantralaya, Mumbai- 400 032**
**No: DMU/2020/CR. 92/DisM-1, Dated: 31st May 2020**

# ORDER

**Easing of Restrictions and Phase-wise opening of Lockdown. (MISSION BEGIN AGAIN)**

---

**Reference:**

1) The Epidemic Diseases Act, 1897
2) The Disaster Management Act, 2005
3) Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation Department Order No. DMU-2020/C.R.92/DMU-1, dated 2nd May 2020, 3rd May 2020, 5th May 2020, 11th May 2020, 15th May 2020, 17th May 2020, 19th May2020 and 21st May 2020
4) Ministry of Home Affairs (MHA) Order No. 40-3/2020-DM-I (A) Dated 1st May 2020, 11th May 2020, 17th May 2020, 20th May 2020 and 30th May 2020

Whereas, in exercise of the powers, conferred under the Disaster Management Act 2005, the undersigned, in his capacity as Chairperson, State Executive Committee has issued an Order dated 17th May, 2020 to extend the lockdown measures up to 31st May, 2020 and issued revised consolidated guidelines from time to time vide above mentioned orders to contain the spread of COVID-19.

Whereas the State Government is satisfied that the State of Maharashtra is threatened with the spread of Covid-19 Virus, and therefore to take certain emergency measures to prevent and contain the spread of the virus, the Government in exercise of the powers conferred under Section 2 of the Epidemic Diseases Act, 1897, read with all other enabling provisions of The Disaster Management Act, 2005, it is expedient to extend the lockdown in the entire State of Maharashtra further till midnight of 30th June 2020.

Now, therefore, in exercise of the powers conferred under section 2 of the Epidemic Diseases Act, 1897 and the powers, conferred under the Disaster Management Act, 2005, the undersigned, in his capacity as Chairperson, State Executive Committee, hereby issues directions to extend the lockdown, with amendments ,to operationalise MISSION BEGIN AGAIN for easing of restrictions and phase-wise opening, till 30th June 2020 for containment of COVID-19 epidemic in the State and all Departments of Government of Maharashtra shall strictly implement the guidelines issued earlier form time to time.

It is further directed that all earlier orders shall be aligned with order and shall remain in force up to and inclusive of 30th June 2020. Further easing under MISSION BEGIN AGAIN will be notified in the due course.

BY ORDER AND IN THE NAME OF THE GOVERNOR OF MAHARASHTRA

(AJOY MEHTA)
CHIEF SECRETARY
GOVERNMENT OF MAHARASHTRA

**Copy to:**

1. Principal Secretary to Hon'ble Governor of Maharashtra, Mumbai,
2. Hon'ble Chairman, Maharashtra Legislative Council,
3. Hon'ble Speaker, Maharashtra Legislative Assembly,
4. Principal Secretary to Hon'ble Chief Minister, Government of Maharashtra,
5. Secretary to Hon'ble Deputy Chief Minister, Government of Maharashtra,
6. Private Secretary to Leader of Oppostion, Legislative Council / Assembly,
7. Private Secretaries of All Hon'ble Minister/Minister of State, Mantralaya,
8. All Additional Chief Secretaries/Principal Secretaries/Secretaries of Government of Maharashtra,
9. Director General of Police, Maharashtra State, Mumbai,
10. Principal Secretary, Public Health Department, Mantralaya,
11. Secretary, Medical Education, Mantralaya,
12. All Divisional Commissioners in the State
13. All Commissioners of Police in the State
14. All Commissioners of Municipal Corporations in the State,
15. All District Collectors,
16. All Chief Executive Officers, Zilla Parishad,
17. All District Superintendents of Police in the State.

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Department of Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation, Mantralaya, Mumbai- 400 03**
**No: DMU/2020/CR. 92/DisM-1, Dated: 31st May 2020**

**Subject: MISSION BEGIN AGAIN (Guidelines for Easing of Restrictions and Phase-wise opening of Lockdown.)**

[As per ministry of Home Affairs (MHA) Order No. 40-3/2020-DM-I (A) dated 30th May 2020, Govt. of Maharashtra Notification No. DMU/ 2020/CR. 92 /DisM-1dated 31st May, 2020 of Department of Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation]

1. This order will come into effect from 1/6/2020 and shall remain effective till 30.06.2020.

2. **National Directives for Covid -19 management**
National Directives for Covid-19 management as specified in **Annexure I** shall be followed throughout the state.

3. **Night Curfew**
The movement of individuals shall remain strictly prohibited between 9pm to 5 am except for essential activities. Local authorities shall issue orders in the entire area of jurisdiction under appropriate provisions of law, such as prohibitory orders under sec 144 of CrPC, and ensure strict compliance.

4. **Protection Of Vulnerable Persons:**
Persons above 65 years of age, persons with comorbidities, pregnant women and children below the age of 10 years are advised to stay home, except for essential and medical services.

5. **Containment Zones**:
   I. Containment zones will be demarcated by Municipal /District Authorities after taking into consideration the guidelines of MoHFW. The municipal commissioners in corporation areas and district collectors in other parts of the district, are empowered to decide the containment zones. Such zones should be a unit which can be effectively governed and efficiently managed considering the recourses availability. The containment zone will be residential colony, mohalla, slum, building, group of buildings, lane, ward, police station area, villages, small cluster of villages etc. Anything larger than this (eg. Whole taluka/ Whole Municipal Corporation etc.) can be declared as containment zone only after consultation with Chief Secretary.

II. In containment zones, only essential activities shall be allowed. There shall be strict perimeter control to ensure there is no movement of people in and out of these zones, except for medical emergencies and for maintaining supply of essential goods. Guidelines of MOHFW shall be taken into consideration for the above purpose.

6. **Easing of Restrictions and Phase wise Opening:**

In Municipal Corporations of MMR Region including MCGM, Municipal Corporations of Pune, Solapur, Aurangabad, Malegaon, Nashik, Dhule, Jalgaon, Akola, Amravati and Nagpur following activities are additionally permitted with restrictions, in phases as described below except containment zones. This is in addition to the activities already allowed and permitted (**Annexure II**).

**MISSION BEGIN AGAIN Phase I (With Effect from 3rd June 2020)**

i. **Outdoor physical activities.**

Individual physical exercises like cycling/ jogging / running / walking shall be permitted on public open spaces including beaches, public / private playgrounds, grounds belonging to societies/institutions, gardens and promenades with following conditions. No activities will be permitted in indoor portion or indoor stadium.

1) This will be allowed between 5 am to 7 pm.
2) No group activity will be permitted. However, children should be accompanied by an adult.
3) People are advised to stay outdoors only for the purposes of physical activities for limited duration.
4) No other activity is permitted.
5) People are permitted to use only nearby/neighbourhood open spaces. Long distance travel will not be permitted.
6) People are advised to avoid crowded open spaces.

People are actively encouraged to use cycling as a form of physical exercise as it automatically ensures social distancing.

ii. Activities related to self-employed people like plumbers, electricians, pest-control and technicians with social distancing norms and usage of masks and sanitization.

iii. Garages to mend vehicles and workshops with prior appointments.

iv. All Government offices (excluding Emergency, health & Medical, treasuries, disaster management, police, NIC, food & Civil Supply, FCI, N.Y.K., Municipal Services who

can operate at the levels as per the need) will function at 15% strength or minimum 15 employees whichever is more.

**MISSION BEGIN AGAIN Phase II (With Effect from 5th June 2020)**

i. All markets, market areas & shops, except malls and market complexes, are allowed to function on P1-P2 basis (shops on one side of the road/lane/passage to be opened on odd dates while shops on the other side on even dates) from 9 am to 5 pm with following conditions.

a. The use of trial rooms in the shops will not be permitted for clothes, apparels and similar items to prevent spread of infection. Similarly exchange policy and return policy will not be permitted.
b. The shopkeepers will be responsible for ensuring social distancing norms in the shops and are encouraged to take measures such as foot markings on the floor, token system, home delivery etc.
c. People are advised to walk / to use cycles for shopping purposes and to use nearby/neighborhood markets as far as possible. Long distance travel for non-essential items will not be permitted. Use of motorized vehicles for shopping will be strictly discouraged.
d. If any failure of social distancing is seen, then authorities will immediately close down such shops/markets.

ii. Movement of people is allowed in following manner :

| | |
|---|---|
| Taxi/Cab/aggregator | Only essential 1 + 2 |
| Rickshaw | Only essential 1 + 2 |
| Four Wheeler | Only essential 1 + 2 |
| Two wheeler | Only essential One Rider |

**MISSION BEGIN AGAIN Phase III ((With Effect from 8th June 2020)**

**i.** All private offices can operate with up to 10% strength as per requirement, with remaining persons working from home. However all the employers will take sensitisation programs to educate the employees to take adequate precautions on returning home so that vulnerable group especially the elderly is not infected.

7. **In the rest of State except the areas covered in clause 6,** all activities, which are not in the clause 8 of this order and which are not explicitly prohibited or banned, shall continue to be permitted, with following conditions.

a. No permission is needed from any govt. authorities for permitted activities.

b. Outdoor portion of Sport complexes and Stadia and other open to sky public spaces will be permitted to remain open for individual exercises; however, spectators and group

activities will not be allowed. No activities will be permitted in indoor portion or indoor stadium. All physical exercise & activities will be done with social distancing norms.

c. All public and private transport will follow passenger management:
   i. Two Wheeler: 1 rider
   ii. Three Wheeler: 1 + 2
   iii. Four Wheeler: 1 + 2

d. Intra district bus service will be allowed with maximum 50% capacity per bus with physical distancing and sanitation measures.

e. Inter-district bus service orders will not be permitted. Orders will be separately issued in this regard.

f. All markets/shops will remain open from 9 a.m. to 5 p.m. If any crowding or failure of social distancing norms is seen, then authorities will immediately close down such shops/markets.

**8. The following activities will remain prohibited across the state:**

i. Schools, colleges, educational, training, coaching institutions etc.
ii. International air travel of passengers, except as permitted by MHA.
iii. Metro Rail.
iv. Passenger Movement by trains and domestic air travel unless specifically allowed through separate orders and standard operating procedure (SOP)
v. Cinema halls, gymnasiums, swimming pools, entertainment parks, theatres, bars and auditoriums, assembly halls and similar places.
vi. Social/ political/ sports/ entertainment/ academic/ cultural/ religious functions and large congregations.
vii. Religious places/ places of worship for public
viii. Barber Shops, Spas, Saloons, Beauty Parlours.
ix. Shopping Malls, Hotels, Restaurants and other Hospitality Services.

*Easing of Restrictions and opening up for these activities will be done in phased manner along with Standard Operating Procedures/Guidelines*

**9. Special directions to ensure movement of persons and goods in certain cases.**

i. All Authorities shall allow inter-State and Intra-State movement of medical professionals, nurses and para medical staff, sanitation personnel and ambulances, without any restriction.

ii. However inter-state and inter-district movement of persons shall continue to be regulated. The movement of stranded labour, migrant workers, pilgrim, tourists etc will continue to be regulated as per SOPs issued.
iii. Similarly, movement of persons by shramik special trains and seafarers will continue to be regulated as per SOPs issued.
iv. Movement of Indian nationals stranded outside the country and of specified persons to travel abroad; evacuation of foreign nationals; sign-on and sign-off of Indian seafarers will continue to be regulated as per SOPs issued.
v. All Authorities shall allow Inter-State movement of all types of goods/ cargo, including empty trucks.
vi. No authorities shall stop the movement of any type of goods/cargo for cross land-border trade under Treaties with neighbouring countries.

**10. Use of Aarogya Setu**

i. Aarogya Setu enables early identification of potential risk of infection, and thus acts as a shield for individuals and the community.
ii. With a view to ensuring safety in offices and workplaces, employers on best effort basis should ensure that Aarogya Setu is installed by all employees having compatible mobile phones.
iii. District authorities may advise individuals to install the Aarogya Setu application on compatible mobile phones and regularly update their health status on the app. This will facilitate timely provision of medical attention to those individuals who are at risk.

**11. General instructions**

a) Notwithstanding anything contained in this order, containment areas will continue to follow same health protocols, as laid down before this order.

b) No district/regional / State authority will issue ANY order/guideline/direction in deviation or contrary to these guidelines, without the approval of Chief Secretary, Maharashtra.

**12. Penal provisions**

Any person violating these measures will be liable to be proceeded against as per the provisions of Section 51 to 60 of the Disaster Management Act, 2005 besides legal action under Sec. 188 of the IPC, and other legal provisions as applicable. Extracts of these penal provisions are at **Annexure III.**

(AJOY MEHTA)
CHIEF SECRETARY
GOVERNMENT OF MAHARASHTRA

**Annexure I**

**[MISSION BEGIN AGAIN: Department of Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation, Mantralaya, Mumbai- 40032, Order No: DMU/2020/CR. 92/DisM-1, Dated: 31st May 2020]**

## National Directives for COVID 19 Management

1) **Face coverings** – wearing of face cover is compulsory in public places, in workplaces and during transport.

2) **Social distancing** – individuals must maintain a minimum distance of 6 feet (*2 Gaz Ki doori*) in public places.
Shops will ensure physical distancing among customers and will not allow more than five persons at one time.

3) **Gatherings** – large public gatherings / congregations continue to remain prohibited.
Marriage related gatherings – Number of guests not to exceed 50.
Funeral / last rites related gatherings – number of persons not to exceed 20.

4) **Spitting in public places** will be punishable with fine, as may be prescribed by the concerned authority in accordance with its laws, rules or regulations.

5) **Consumption of liquor, Paan, tobacco, etc** in public places is prohibited.

***Additional directives for workplaces.***

6) **Work from home (WFH)** – as far as possible the practice of WFH should be followed. Staggering of work / business hours will be followed in offices, workplaces, shops, markets and industrial & commercial establishments.

7) **Screening and hygiene** – provision for thermal scanning, hand wash and sanitizer will be made at all entry and exit points and common areas.

8) **Frequent sanitization** of entire workplace, common facilities and all points which come into human contact e.g. door handles etc. will be ensured, including between shifts.

9) **Social distancing** – all persons in charge of workplaces will ensure adequate distance between workers, adequate gaps between shifts, staggering the lunch breaks of staff, etc.

**Annexure II**

**[MISSION BEGIN AGAIN: Department of Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation, Mantralaya, Mumbai- 40032, Order No: DMU/2020/CR. 92/DisM-1, Dated: 31st May 2020]**

**For the purposes of Clause 6:**
**Activities permitted so far by various orders upto order dated 19th May 2020**

i. All essential shops which are allowed to remain open before this order, shall continue to do so.

ii. All non-essential shops will be allowed to continue as per relaxations and guidelines issued before this order and are in operation as per the policy of respective Municipal Corporation. Liquor shops will continue to operate if permitted, home delivery or otherwise.

iii. E-commerce activity for essential as well as non-essential items & material.

iv. All the industrial units which are presently open will continue to operate.

v. All construction sites (Public/Private) which are allowed to remain open and operational. All such pre-monsoon works (Public and Private) which are allowed.

vi. Home delivery restaurants / Kitchen.

vii. On-line/ distance learning and related activities.

viii. Govt Offices at 5% strength or 10 persons whichever is higher.

ix. People's movement is allowed in following manner :

| | |
|---|---|
| Four Wheeler | Only essential 1 + 2 |
| Two wheeler | Only essential One Rider |

x. Any other allowed and permitted activity by any specific/general order.

**Annexure III**

**[Department of Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation, Mantralaya, Mumbai-40032, Order No: DMU/2020/CR. 92/DisM-1, Dated: 31st May 2020]**

## Offences and Penalties for Violation of Lockdown Measures

### A. Section 51 to 60 of the Disaster Management Act, 2005

**51. Punishment for obstruction, etc.**—Whoever, without reasonable cause —

(a) obstructs any officer or employee of the Central Government or the State Government, or a person authorised by the National Authority or State Authority or District Authority in the discharge of his functions under this Act; or

(b) refuses to comply with any direction given by or on behalf of the Central Government or the State Government or the National Executive Committee or the State Executive Committee or the District Authority under this Act,

shall on conviction be punishable with imprisonment for a term which may extend to one year or with fine, or with both, and if such obstruction or refusal to comply with directions results in loss of lives or imminent danger thereof, shall on conviction be punishable with imprisonment for a term which may extend to two years.

**52. Punishment for false claim.**—Whoever knowingly makes a claim which he knows or has reason to believe to be false for obtaining any relief, assistance, repair, reconstruction or other benefits consequent to disaster from any officer of the Central Government, the State Government, the National Authority, the State Authority or the District Authority, shall, on conviction be punishable with imprisonment for a term which may extend to two years, and also with fine.

**53. Punishment for misappropriation of money or materials, etc.**—Whoever, being entrusted with any money or materials, or otherwise being, in custody of, or dominion over, any money or goods, meant for providing relief in any threatening disaster situation or disaster, misappropriates or appropriates for his own use or disposes of such money or materials or any part thereof or wilfully compels any other person so to do, shall on conviction be punishable with imprisonment for a term which may extend to two years, and also with fine.

**54. Punishment for false warning.**—Whoever makes or circulates a false alarm or warning as to disaster or its severity or magnitude, leading to panic, shall on conviction, be punishable with imprisonment which may extend to one year or with fine.

**55. Offences by Departments of the Government.**—(1) Where an offence under this Act has been committed by any Department of the Government, the head of the Department shall be deemed to be guilty of the offence and shall be liable to be proceeded against and punished accordingly unless he proves that the offence was committed without his knowledge or that he exercised all due diligence to prevent the commission of such offence.

(2) Notwithstanding anything contained in sub-section (1), where an offence under this Act has been committed by a Department of the Government and it is proved that the offence has been committed with the consent or connivance of, or is attributable to any neglect on the part of, any officer, other than the head of the Department, such officer shall be deemed to be guilty of that offence and shall be liable to be proceeded against and punished accordingly.

**56. Failure of officer in duty or his connivance at the contravention of the provisions of this Act.**—Any officer, on whom any duty has been imposed by or under this Act and who ceases or refuses to perform or withdraws himself from the duties of his office shall, unless he has obtained the express written permission of his official superior or has other lawful excuse for so doing, be punishable with imprisonment for a term which may extend to one year or with fine.

**57. Penalty for contravention of any order regarding requisitioning.**—If any person contravenes any order made under section 65, he shall be punishable with imprisonment for a term which may extend to one year or with fine or with both.

**58. Offence by companies.**—(1) Where an offence under this Act has been committed by a company or body corporate, every person who at the time the offence was committed, was in charge of, and was responsible to, the company, for the conduct of the business of the company, as well as the company, shall be deemed to be guilty of the contravention and shall be liable to be proceeded against and punished accordingly: Provided that nothing in this sub-section shall render any such person liable to any punishment provided in this Act, if he proves that the offence was committed without his knowledge or that he exercised due diligence to prevent the commission of such offence. (2) Notwithstanding anything contained in sub-section (1), where an offence under this Act has been committed by a company, and it is proved that the offence was committed with the consent or connivance of or is attributable to any neglect on the part of any director, manager, secretary or other officer of the company, such director, manager, secretary or other officer shall also, be deemed to be guilty of that offence and shall be liable to be proceeded against and punished accordingly.

*Explanation.*—For the purpose of this section— (a) "company" means anybody corporate and includes a firm or other association of individuals; and (b) "director", in relation to a firm, means a partner in the firm.

**59. Previous sanction for prosecution.**—No prosecution for offences punishable under sections 55 and 56 shall be instituted except with the previous sanction of the Central Government or the State Government, as the case may be, or of any officer authorised in this behalf, by general or special order, by such Government.

**60. Cognizance of offences.**—No court shall take cognizance of an offence under this Act except on a complaint made by— (a) the National Authority, the State Authority, the Central Government, the State Government, the District Authority or any other authority or officer authorised in this behalf by that Authority or Government, as the case may be; or (b) any person who has given notice of not less than thirty days in the manner prescribed, of the alleged offence and his intention

to make a complaint to the National Authority, the State Authority, the Central Government, the State Government, the District Authority or any other authority or officer authorized as aforesaid.

## B. Section 188 in the Indian Penal Code, 1860

**188**. Disobedience to order duly promulgated by public servant.—Whoever, knowing that, by an order promulgated by a public servant lawfully empowered to promulgate such order, he is directed to abstain from a certain act, or to take certain order with certain property in his possession or under his management, disobeys such direction, shall, if such disobedience causes or tends to cause obstruction, annoyance or injury, or risk of obstruction, annoyance or injury, to any person lawfully employed, be punished with simple imprisonment for a term which may extend to one month or with fine which may extend to two hundred rupees, or with both; and if such disobedience causes or trends to cause danger to human life, health or safety, or causes or tends to cause a riot or affray, shall be punished with imprisonment of either description for a term which may extend to six months, or with fine which may extend to one thousand rupees, or with both.

*Explanation.*—It is not necessary that the offender should intend to produce harm, or contemplate his disobedience as likely to produce harm. It is sufficient that he knows of the order which he disobeys, and that his disobedience produces, or is likely to produce, harm.

*Illustration*

An order is promulgated by a public servant lawfully empowered to promulgate such order, directing that a religious procession shall not pass down a certain street. A knowingly disobeys the order, and thereby causes danger of riot. A has committed the offence defined in this section.

***